# प्रेस नोट

## ''भंडारा जिल्हा वार्षिक पोलीस कल्याण सप्ताह निमीत्त सांकृतीक कार्यकम व बक्षिस वितरणाचे आयोजन ''

जा.क्र. २९६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:— ०८/०६/२०१८

**भंडारा**: मा. पोलीस महासंचालक यांचे सौजन्याने तसेच मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेला ३ ते ८ जुन दरम्यान **पोलीस कल्याण सप्ताह** म्हणुन साजरा करण्यात आला. वार्षिक पोलीस कल्याण सप्ताह निमीत्ताने भंडारा जिल्हा पोलीस दलाचे वतीने शासनाच्या विवीध योजने बाबत जागरुकता निर्माण करण्याकरीता आज दिनांक ०८/०६/२०१८ चे १६.०० ते १७.०० वाजता पासुन पोलीस मुख्यालय बहुउद्देशीय हॉल भंडारा येथे पोलीस विभाग भंडारा यांचे संयुक्त विद्यमाने मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती रश्मि नांदेडकर यांचे प्रमुख उपस्थितीत रांगोळी, चित्रकला, पथनाटय, फॅन्सी ड्रेस स्पर्धा अश्या विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पोलीस कल्याण सप्ताहा निमीत्ताने वेगवेगळे सांस्कुतीक कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये पोलीस पाल्य तसेच पोलीस कर्मचा—यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये प्रथम पारीतोषीक, व्दितीय पारीतोषीक, तृतीय पारीतोषीक ठेवण्यात आले. रांगोळी स्पर्धचे प्रथम विजेते — दिपक बुलबुले, व्दितीय विजेते शिवानी मुनीश्वर, तृतीय विजेते विजया पुरुषोत्तम घोरमोडे तसेच चित्रकला स्पर्धचे प्रथम विजेते पुर्वा अरुण वैदय, व्दितीय विजेते स्नेहल राजेश येडमाचे तृतीय विजेते यश विनोद पाऊलखेडे व फॅन्सी ड्रेस स्पर्धेत प्रथम विजेते अनुराज सातपुडके, व्दितीय विजेते अक्षरा ठवरे तृतीय विजेते प्रित गायकवाड त्याचप्रमाणे वैभवी पाटील यांनी एकपात्री प्रयोग केला, प्रथम, व्दितीय व तृतीय विजेत्यांना रोख रक्कम व प्रशस्ती पत्र देण्यात आले. त्याचप्रमाणे सहभागी सर्वांना मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू यांचे प्रशस्तीपत्र देवुन बक्षिस वितरण करण्यात आले. तसेच पोलीस कल्याण निधीतुन पोलीस पाल्यांना बस्ता अनुदान, तसेच गर्भवती पोलीस महिलांना पोलीस कल्याण मार्फत विशेष पोषण अनुदान, वाटप करण्यात आले.

सांस्कृतीक कार्यक्रमाला उपस्थित उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा जोगदंड, पोनि. पिपरेवार, सपोनि. पोटे, सपोनि. क्रिष्णा हत्तीमारे जिविशा भंडारा, सपोनि. वर्मा साकोली हे उपस्थित होते. पोलीस मुख्यालयाचे राखीव पोलीस निरीक्षक प्रधान, मपोउपनि. चाटसे महिला सेल भंडारा, मपोउपनि. लांजेवार दामीनी पथक यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मपोशि. योगीनी नाकतोडे तसेच कार्यक्रमाला पोलीस अधिकारी/ कर्मचारी व पोलीस कुंटुबीयांचा बहुसंख्येने सहभाग होता.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.